किसान विद्या प्रसारक संस्थेचे
किसान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
Kisan Vidya Prasarak Sanstha's
**KISAN ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
PAROLA - 425 111 (Dist. Jalogaon) M.S.
Office : (02597) 292441 Principal : Phone & Fax (02597) 293688
Website : www.kisanacscollegeparola.co.in
Email : pricipalkc@rediffmail.com
Dr. Y. V. Patil (M.Sc., M.Phil., Ph.D.)
Principal

Outward No. : /202 -202 Date : / /202

State Level Marathi Poem Workshop Report **(2017-2018)**

| Name of activity | |
|---|---|
| State Level Marathi Poem Workshop | |
| Date of Activity | 30/01/2018 to 31/01/2018 |
| Organizing department | Marathi |
| Collaborating/sponsoring agency | KBC NMU Jalgaon |
| Number of participated | 69 |
| Impact of activity | Increasing the awareness of Marathi drama of post among the faculties in the region of north Maharashtra region |

In this academic year, "State Level Marathi Poetry Workshop" was organized on 30th and 31st January 2018 to discuss the creation, writing structure of Marathi poetry among the students in order to create interest, interest, direction.

Kisan Vidya Prasarak Sanstha, under the guidance of Hon'ble President Annasaheb Dr. Satish Patil and under the chairmanship of Dr. Y.V. Patil, Principal of the college, the poetry workshop was organized. The chief guest poet, Kamlakar Desale, Dhule Prof. Dr. Vasudev Wale, Pachora, poet Phula Bagul, Shirpur and students and teachers from the college were present. On the Pahiya day, the program was introduced by the head of the Marathi department, Dr. Manik Bagle. poet Kamalakar Desale and other distinguished poets were guided.

On the second day, under the guidance of poet Phula Bagul Sirpur, Poet Sanjeev Kumar Sonwane, Dharangaon, poet Ramesh Mane, Amalner, Poet students and teachers of the college were present for this workshop. Due to social media in the workshop, there was an immeasurable harvest of poetry. However, in the changing times, such poems have no future.On these two days, State Level Poetry Workshop Coordinator Dr. Pradeep Aujekar, Head of Marathi Department Dr. Manik Bagle and other faculty members of the college cooperated.

Dr. Manik Bagle
Head of Marathi Department

KVPS Kisan Arts, Commerce & Science College PAROLA Dist.Jalgaon 425111

Dr Y V Patil
**Principal**
Kisan Vidya Prasarak Sanstha's
Kisan Arts, Commerce & Science
College, Parola Dist. Jalgaon

Sanction letter

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

'A' Grade
(NAAC Re-accredited )
(3rd Cycle)

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव

## संशोधन व विकास विभाग

जा क्र. उमवि/११ए/ ७.०४/वि.अर्थसंकल्प/४७/ ३०९/प.सभा/२०१७ दिनांक :- १२.०८.२०१७

प्रति,
मा.प्राचार्य,
किसान कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,पारोळा जि.जळगाव.

विषय:- विद्यापीठ अर्थसंकल्प **2017-18** मधील "महाविद्यालयांना परीषदांसाठी अनुदान" अर्थशिर्ष क्र.7.04 या अंतर्गत महाविद्यालयास परिषदा/चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनासाठी अनुदान मंजूरी बाबत...

संदर्भ:-आपलेकडील जा.क्र. 91/**2017-18** दि. 29.06.2017 चे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भीय प्रस्तावान्वये, आपल्या महाविद्यालयात **"मराठी कवितेची कार्यशाळा "** या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील दि. 06 व 07 ऑक्टोबर 2017 दोन दिवसीय कार्यशाळा आयोजनासाठी विद्यापीठाकडे **₹ ११.०००/- चे आर्थिक सहाय्य** मिळणेकरीता आपण विनंती केलेली आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, मा कुलगुरु महोदयांनी अनुदान वितरीत करण्यासाठी शिफारशी करणेकरीता नियुक्त केलेल्या गठीत समितीच्या शिफारशी नुसार विद्यापीठाच्या **आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील अ.क्र. ७.०४-** अंतर्गत **'महाविद्यालयांना परिषदांसाठी अनुदान'** या अर्थशिर्षांतर्गत केलेल्या आर्थिक तरतूदीमधून विहित नियमावलीस अनुसरुन आपल्या महाविद्यालयास सदर परीषद आयोजनासाठी **₹ १०,०००/- ( रु. दहा हजार मात्र) आर्थिक सहाय्य** मंजूर करण्यात येत आहे.

तेव्हा, सदरची **राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा** आयोजनाच्या संपन्नतेच्या पश्चात, **झालेल्या खर्चाची देयकांसोबत माहिती पत्रक, परिषेदेत सहभागी झालेल्या व्यक्तींना देण्यात आलेल्या प्रमाणपत्राची Blank Copy, कार्यशाळेचा अहवाल, एकाच पुरवठादाराकडुन ₹ ५,०००/- पेक्षा जास्त खरेदी केली असल्यास वेगवेगळया पुरवठादारांचे किमान ३ कोटेशन व त्यांचा तुलनात्मक तक्ता उपयोगिता प्रमाणपत्र इ.** दस्तऐवज विद्यापीठाकडे **पंधरा दिवसाच्या** आत दोन प्रतीत (१ मुळ + १ छायांकीत प्रत) सादर करावे. उशिरा प्राप्त झालेली देयके व उपयोगिता प्रमाणपत्रावावत कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

तसेच काही कारणास्तव आपण सदर कार्यशाळा आयोजन केले नसल्यास, त्यावावत विद्यापीठास त्वरीत कळवावे कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती.

**टिप:- १. मंजूर आर्थिक रकमेचा कार्यक्रमाचे उद्घाटन व भोजनासाठी येणा-या खर्चाकरीता विनियोग करु नये.**

आपला विश्वासू

उपकुलसचिव
संशोधन व विकास विभाग

**प्रत माहितीसाठी :**
मा.वित्त व लेखा अधिकारी,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Principal
KVPS Kisan Arts, Commerce & Science College,Parola Dist.Jalgaon 425111

KVPS Kisan Arts, Commerce & Science College • PAROLA Dist.Jalgaon 425111

☎ : (९१) ०२५७-२२५७२२१ व २२५८४०१ (कार्यालय)
(९१) ०२५७-२२५७२२२-२२५७२२५ विस्तारीत क्र.२२१-२२५
फॅक्स : (९१) ०२५७-२२५८४०३ व २२५८४०६
वेबसाईट : www.nmu.ac.in
ई-मेल : bcud_nmu@hotmail.com
bcud@nmu.ac.in

Notice

...किसान विद्या प्रसारक संस्थेचे...
किसान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
.....Kisan Vidya Prasarak Sanstha's.....
**KISAN ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
PAROLA - 425 111. (Dist. Jalgaon) M. S.
☎ Office : (02597) 292441 • Principal : Phone & Fax (02597) 293688
Website : www.kisanacscollegeparola.in
e-mail : principalkc@rediffmail.com
Dr. Y. V. Patil M. Sc., M. Phil., Ph. D.
Principal

## सूचना

दिनांक १५/०१/२०१८

सर्व विद्यार्थ्यांना कळवितांना आनंद होतो की, आपल्या महाविद्यालायात दिनांक ३० व ३१ जानेवारी २०१८ रोजी मराठी विभाग आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने "राज्यस्तरीय मराठी कवितेची कार्यशाळा" आयोजित केली आहे..

सदर कार्यशाळेत कविता या वाङ्मयप्रकारावर सखोल मार्गदर्शन करण्यात येईल. नवोदित कवी मित्र व विद्यार्थ्यांनी सहभागसाठी आपली नावे मराठी विभागातील प्रा.डॉ.प्रदिप औजेकर, प्रा.डॉ.ज्ञानेश्वर भोई यांच्याकडे दिनांक २५/०१/२०१८ पर्यंत द्यावीत, ही विनंती.

**सूचना :**

१) सदर कार्यशाळेसाठी प्रवेश शुल्क १०० /- राहील. (भोजन व निवास व्यवस्था विद्यार्थ्यांची राहील )

२) सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात येईल.

३) सदर कार्यशालेचा कालावधी सकाली ठीक १० : ०० ते ०५ : ०० असा राहील.

४) विद्यार्थ्यांनी सोबत दोन पासपोर्ट फोटो व ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे .

मराठी विभागप्रमुख

K.V.P.S. Kisan Arts, Comm. & Science College, PAROLA, Dist.Jalgaon

प्राचार्य

Scheduled of Ist day workshop

किसान विद्याप्रसारक संस्थेचे,

# किसान कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,पारोळा

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव पुरस्कृत

"राज्यस्तरीय मराठी कवितेची कार्यशाळा"

दिनांक : ३० व ३१ जानेवारी २०१८

## उदघाटन समारंभ - कार्यक्रम रूपरेषा

North Maharashtra University

- प्रास्ताविक : प्रा. डॉ. माणिक बागले
- उदघाटन/दीपप्रज्वलन : प्रा. डॉ. आशुतोष पाटील
- परिचय/स्वागत : अध्यक्ष/प्रमुख पाहुणे
- मार्गदर्शन : प्रा. डॉ. आशुतोष पाटील
  कवी. कमलाकर देसले
  प्रा. डॉ. वासुदेव वले
- अध्यक्षीय भाषण : प्रा. डॉ. गुणवंत सोनवणे
- आभार : प्रा. डॉ. प्रदिप औजेकर

Kisan Arts, Commerce & Science College PAROLA Dist.Jalgaon 425111

Principal
KVPS Kisan Arts, Commerce & Science College,Parola Dist.Jalgaon

Scheduled of II day workshop

किसान विद्याप्रसारक संस्थेचे,

# किसान कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,पारोळा

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव पुरस्कृत

"राज्यस्तरीय मराठी कवितेची कार्यशाळा"

दिनांक : ३० व ३१ जानेवारी २०१८

**समारोप समारंभ - कार्यक्रम रूपरेषा**

- प्रास्ताविक : प्रा. डॉ. माणिक बागले
- परिचय/स्वागत : अध्यक्ष/प्रमुख पाहुणे
- मार्गदर्शन : कवी. डॉ. संजीवकुमार सोनवणे
  प्रा. डॉ. रमेश माने
- अध्यक्ष : प्राचार्य.डॉ.वाय.व्ही.पाटील
- समारोप भाषण : प्रा. डॉ. फुला बागुल
- आभार : प्रा. डॉ. प्रदिप औजेकर

KVPS Kisan Arts, Commerce & Science College • PAROLA Dist.Jalgaon 425111

Principal
KVPS Kisan Arts, Commerce & Science
College.Parola Dist.Jalgaon 425111

Certificated of workshop

किसान विद्याप्रसारक संस्थेचे,

# किसान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारोळा,

जि.जळगाव. ४२५१११ (नॅक पुन:प्रमाणित 'ब' श्रेणी)

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव पुरस्कृत

## प्रमाणपत्र

## राज्यस्तरीय मराठी कवितेची कार्यशाळा

दिनांक: ३० व ३१ जानेवारी २०१८

प्रा./ डॉ./ श्री. /श्रीमती/ ______________________________

______________________________ यांनी

दिनांक ३० व ३१ जानेवारी २०१८ रोजी आयोजित " राज्यस्तरीय मराठी कवितेची कार्यशाळा " यात उदघाटक / अध्यक्ष / प्रमुख पाहुणे / प्रतिनिधी म्हणून सक्रीय सहभाग घेतला त्याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

KVPS Kisan Arts, Commerce & Science College PAROLA Dist.Jalgaon 425111

Principal Kisan Arts, Commerce & Science College,Parola Dist.Jalgaon 425111

| डॉ. प्रदीप जे. औजेकर | डॉ. माणिक एम. बागले | डॉ. [illegible] व्ही . पाटील |
|---|---|---|
| समन्वयक | मराठी विभाग प्रमुख | प्राचार्य |

Photographs of workshop participants



Dr  Sanjikumar Sonwane Guiding the workshop



Prof. Ashutosh Patil KBC NMU Jalgaon Guiding at Workshop



Participant of the workshop



Prof. Ashutosh Patil KBC NMU Jalgaon Guiding at Workshop



Prof Phula Bagul, Shirpur Guiding the workshop




Dr Ramesh Mane, Amalner Guiding the workshop

News of Workshop


दैनिक दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
एकूण पाने : १२+४=१६ । किंमत ₹ ४.०० | वर्ष ७ । अंक १४१ । महानगर
जळगाव | गुरुवार, १ फेब्रुवारी २०१८
divyamarathi.com | दिव्य मराठी, जळगाव, गुरुवार, १ फेब्रुवारी २०१८


शैक्षणिक | पारोळ्याच्या कार्यशाळेत धरणगावचे डॉ. संजीवकुमार सोनवणेंचे मत

# कविला मिळालेले सन्मानाचे कोंदण हा शब्दांचा खरा गौरव

## किसान महाविद्यालयातील कार्यशाळेचा झाला समारोप

प्रतिनिधी । पारोळा

सोशल मीडियामुळे कवितेचे अमाप पीक आले. मात्र, बदलत्या काळात अशा कवितांना भवितव्य नाही. कवीला आपली कविता रसिकांनी कायम स्मरणात ठेवावी, असे वाटत असेल तर खूप वाचन करावे. अनुभवांची समृद्धी केली पाहिजे त्यासाठी कवितेची साधना करायला हवी. कविला मिळालेले सन्मानाचे कोंदण हा शब्दांचा खरा गौरव आहे, असे विचार धरणगावचे कवी डॉ. संजीवकुमार सोनवणे यांनी येथे व्यक्त केले.

पारोळा येथे किसान महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ पुरस्कृत राज्यस्तरीय मराठी कवितेची दोन दिवसीय कार्यशाळा मंगळवार व बुधवार अशी आयोजित करण्यात आली. समारोपाच्या सत्रात 'कवी आपल्या भेटीला' या चर्चासत्रात डॉ. सोनवणे यांनी संवाद साधला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. फुला बागूल हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून प्रताप महाविद्यालय अमळनेर येथील समीक्षक प्रा.डॉ. रमेश माने यांची उपस्थिती होती. कार्यशाळेच्या समारोपसत्राचे अध्यक्ष म्हणून किसान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय.व्ही. पाटील यांची उपस्थिती होती. प्रारंभी प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. माणिक बागले यांनी केले. प्रा.रमेश माने यांनी काव्यस्वादाची उदाहरणे देऊन कवितेचे विविध पदर उलगडून दाखवले. डॉ.संजीवकुमार सोनवणे यांनी 'मी आणि माझी कविता' या विषयावर आपल्या काव्य लेखनाची वैविध्यता कथन केली. कविता ही समाजासाठी आणि व्यक्तीच्या गौरवासाठी लिहिली पाहिजे, हे स्पष्ट करून त्यांनी क्षणभंगुर कविता आणि चिरकाल टिकणारी कविता, मंचीय कविता आणि गांभिर्याने लिहिलेली कविता यांच्यातील भेद उदाहरणे देऊन कथन केला. विद्यापीठीय अभ्यासक्रमात कविता येणं म्हणजेच विद्यार्थ्यांकडून आपल्या काव्य लेखनाचे गुण दोष समजून घेणं होय. काव्य लेखनामुळे कवीला मिळालेला सन्मान हा त्याच्या शब्दाचांचा गौरव असतो. दोन ओळींची कविताही कवीला रसिकांपर्यंत पोहोचवते म्हणून भराभर न लिहिता योग्य लेखन करा असे आवाहन डॉ. सोनवणे यांनी केले.

### कमी शब्दात मोठा आशय सांगते ते काव्य

डॉ. फुला बागूल यांनी कविता कशी लिहायची ? यासंबंधी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, केवळ टाळ्या घेणारी व हास्य निर्माण करणारी कविता ही खरी नसते. तर कमी शब्दांतही मोठा आशय व्यक्त करणारी कविता कायम टिकते. प्राचार्य डॉ.वाय.व्ही.पाटील यांनी अध्यक्षीय भाषण केले. सूत्रसंचालन कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. प्रदीप औजेकर यांनी केले. प्रा. शशी पाटील, प्रा. डॉ.पी.पी. पाटील, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर भोई, प्रा. एच.एन. सरदार, प्रा. संगीता चौधरी, प्रा. पी.एम. नेतकर, प्रा. एस.बी. बाविस्कर यांच्यासह नवलेखक, कवी, विद्यार्थी उपस्थित होते.



कार्यशाळेत बोलताना कवी डॉ. संजीवकुमार सोनवणे.

### भावना प्रकटीकरणाचे सामर्थ्य फक्त काव्यात

अव्यक्त भावना प्रकटीकरणाचे सामर्थ्य काव्यात आहे, असे विचार उपप्राचार्य डॉ. जी.एच. सोनवणे यांनी उद्घाटन सत्रात मांडले. प्रास्ताविक प्रा.डॉ. मानिक बागले यांनी केले. उद्घाटन विद्यापीठ मराठी अभ्यास प्रशाला विभागप्रमुख डॉ. आशुतोष पाटील यांनी केले. नवोदीत कविंना धुळे येथील कवी कमलाकर दुसाने यांनी मार्गदर्शन केले. कवितेचा आशय व रचना, लेखनाचा अनुभव हे विषय त्यांनी मांडले. प्रा. अनिता मुडावदकर, प्रा.डॉ. गव्हाणे, प्रा. नितीन पाटील, प्रा. वाघमारे, विद्यापीठ प्रतिनिधी नीलेश पाटील, अरुण महाजन उपस्थित होते.

Principal
KVPS Kisan Arts, Commerce & Science College, Parola Dist.Jalgaon 425111

KVPS Kisan Arts, Commerce & Science College PAROLA Dist.Jalgaon 425111

प्राचार्य

नवी आशा, नवी दिशा

# देशदूत

Edition: mobile.deshdoot.com www.facebook.com/deshdoot www.deshdoot.co

| जळगाव | गुरुवार, दि. १ फेब्रुवारी २०१८ | वर्ष २१ | अंक ४० | पाने : १०+४ | किंमत : ₹ ४ |



## अव्यक्त भावना प्रकटीकरणाचे सामर्थ्य काव्य प्रकारात - डॉ.जी.एच.सोनवणे

**■ पारोळा, । दि. ३१ । प्रतिनिधी**

यथील किसान महाविद्यालय व उम विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित द्विदिवसीय मराठी कविता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ जी एच सोनवणे हे होते. श्री सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणात विचार व्यक्त करताना काव्यप्रकार सशक्त असुनही नवलेखक कवि युवकांनी नव साहित्यद्वारे ग्रामीण चालीरीती आधुनिकीकरणासह समाजाला अग्रेसर करावे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मानिक बागले यांनी केले. तर या कार्यशाळेचे उद्घाटन उम विद्यापीठ मराठी अभ्यास प्रशालाचे विभाग प्रमुख डॉ. आशुतोष पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.महाविद्यालयिन नव कविंना मार्गदर्शन धुळे येथील कविवर्य कमलाकर दुसाने यांनी मार्गदर्शन करताना कवितेचे आशय व रचना शब्द पदातील माधुर्यसह काव्य ईतिहास लेखनात अनुभव महत्वपूर्ण आहे याकरिता उत्कटता असावी अभंग छंद व्रुत्त विषयी माहिती करून दिली. विभिन्न महाविद्यालयातील नवकविंसह प्रा. अनिता मुडावदकर प्रा. डॉ. गव्हाणे प्रा. नितीन पाटील प्रा. वाघमारे, यु. आर. निलेश पाटील . अरुण महाजन उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. औजेकर यांनी मानले.

KVPS Kisan Arts, Commerce & Science College • PAROLA Dist.Jalgaon 425111

**Principal**
KVPS Kisan Arts, Commerce & Science College,Parola Dist.Jalgaon 425111

प्राचार्य
कि.वि.प्र.संस्थेचे किसान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारोळा, जि.जळगांव